ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ पुणें, बुधवार तारीख २ ऑगस्ट, १९६१ अंक १५

## विविध माहिती

**१० वर्षांत १२० कोटींचें नुकसान**—अतिवृष्टि आणि अनावृष्टि ह्या कारणांमुळें बिहारची अर्थव्यवस्था गेल्या १० वर्षांत खूपच दुबळी झाली आहे. ह्या कालांत झालेलें पिकांचें नुकसानच ८५ कोटी रुपयांच्या घरांत जाईल. त्याशिवाय घरें, बांध, रस्ते, ह्यांना पोंचलेली हानि लक्षांत घेतां नुकसानीचा आंकडा १२० कोटीपर्यंत जाईल.

**कीटकशास्त्रज्ञांची मोहीम**—आग्रा येथील सेंट जॉन कॉलेजचे डॉ. सनोकासिंग ह्यांनीं वायव्य हिमालयांत एक मोहीम काढली होती. ते एक प्रसिद्ध कीटकशास्त्रज्ञ आहेत. हिमालयांत आढळणाऱ्या कीटकांच्या जातींची माहिती गोळा करण्यासाठी त्यांनीं ही मोहीम काढली होती. हिमालयासारख्या थंड प्रदेशांतहि कीटकांच्या पुष्कळ जाती असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यांनीं सुमारें ५,००० नव्या कीटकांचे नमुने आणले आहेत.

**सिनेमाच्या धंद्यांत तंटा**—पश्चिम बंगाल सरकारनें सिनेमाच्या थिएटर्समध्यें काम करणाऱ्या लोकांना किमान वेतन देण्याचा कायदा केला आहे. चित्रगृहाच्या मालकांनीं तो अमलांत न आणल्यामुळें कामगार असंतुष्ट झाले होते. कलकत्ता शहर व आसपासच्या भागांत सुमारें ४०० चित्रगृहें असून त्यामधून ११,००० कामगार काम करीत असतात.

**महारोगावरील उपचार**—महारोगावर करण्यांत येणाऱ्या उपचारांचें शिक्षण डॉक्टरांना देण्याचें एक आंतरराष्ट्रीय केंद्र वेलोर येथें उघडण्यांत येणार आहे. ह्या केंद्रासाठी ब्रिटन, अमेरिका, स्वीडन, स्वित्झरलंड, इत्यादि देशांकडून मदत मिळणार आहे. वेलोर येथील ख्रिश्चन मिशन मेडिकल कॉलेज ह्या कामीं विशेष लक्ष घालीत आहे.

**नेपाळमध्यें कापड गिरणी**—नेपाळमध्यें एक आधुनिक कापडगिरणी स्थापन करण्याचा करार नेपाळ सरकारनें एका भारतीय कंपनीबरोबर केला आहे. गिरणीच्या उभारणीसाठी १·६५ कोटी रुपये भांडवल लागेल, ही गिरणी नेपाळमधील सर्वांत मोठी असेल आणि तींत ४०० माग व १५,००० चात्या असतील. गिरणी दरसाल २ कोटी वार कापडाचे उत्पादन करील.

**कापडधंदा परिषद**—कापडाची आयात व निर्यात करणाऱ्या १७ प्रमुख देशांची परिषद जिनीव्हा येथें भरविण्यांत आली होती. परिषद ४ दिवस पर्यंत चालली. कापडाच्या जागतिक बाजारपेठेंत उत्पन्न झालेली गोंधळाची परिस्थिति सुधारण्यासंबंधी परिषदेंत विचार करण्यांत आला. अमेरिकेंतील कापडाच्या अंतर्गत बाजारपेठेंत विपरीत परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें गॅट ह्या संघटनेतर्फे ती भरविण्यांत आली होती.

**बरौनी कारखान्याची यंत्रसामग्री**—बरौनी येथें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी इंडिअन रिफायनरीज लि. आणि सोव्हिएट संघटना ह्यांच्यांत करार झाला आहे. कराराला अनुसरून रशिआ ३८,००० टन वजनाची यंत्रसामग्री पुरविणार आहे. ह्या कारखान्यांत पेट्रोल, रॉकेल, डांबर, इत्यादि पदार्थ तयार करण्यांत येणार आहेत.

**भारतीय बनावटीचीं घड्याळें**—हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यांत बनविण्यांत आलेलीं भारतीय बनावटीचीं मनगटी घड्याळें लवकरच बाजारांत येणार आहेत. प्रथम सुमारें ५०० घड्याळें बाजारांत येतील. तीं बंगलोर येथील कारखान्यांत जुळविण्यांत आलीं असून त्यांची किंमत प्रत्येकी ९० रुपये असेल. घड्याळें बनविण्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञांना जपानमध्यें शिकवून आणण्यांत येत आहे.

**पुरामागोमाग रोगराई**—केरळमध्यें आलेल्या प्रचंड पुरामागोमाग कांहीं भागांत रोगराई पसरू लागली आहे. कावीळ व अतिसार ह्या रोगांचा आढळ विशेष प्रमाणांत दिसत आहे. वैद्यकीय अधिकारी लोकांना शक्य ती मदत करीत आहेत. परंतु औषधांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें त्यांच्या कामांत अडथळे उत्पन्न होत आहेत. सरकारकडून औषधें पुरविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

**हवामानाच्या माहितीचें केंद्र**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उत्तर भारतांत हवामानाची माहिती देणारें एक केंद्र स्थापन करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. अरबस्थान ते सयामपर्यंतच्या भूभागांतील हवामानासंबंधीं ते माहिती पुरवतील. जेटवर चालणाऱ्या व दूरवर प्रवास करणाऱ्या विमानांना माहिती पुरविण्यासाठी ह्या केंद्राचा विशेष उपयोग होणार आहे.

**पुण्यांतील घरांची पडझड**—गेल्या महिन्यांत मुठा नदीला आलेल्या महापुरांत पुण्यांतील ४ हजार घरें पडलीं असावीं अगर राहण्यास अयोग्य झालीं असावीं असा अंदाज करण्यांत आला आहे. शहराच्या ६ लाख लोकवस्तींपैकी ८४,००० लोक बेघर झाले असावे. १०० कारखान्यांचें नुकसान झाल्यानें हजारों लोक बेकार झाले आहेत.

**पुण्यासाठीं गुजरातमधून दूध**—पुण्यामधील पूरग्रस्तांना मदत म्हणून गुजरातमधून रोज २०० मण निर्जंतुक दूध पाठविण्यांत येत आहे. पुणें शहरांतील दूधपुरवठ्याची योजना पुरामुळें उध्वस्त झाल्यावर आरे येथील दूधपुरवठा-योजनेच्या अधिकाऱ्यांनीं गुजरातकडे दुधाची मागणी केली होती. जरूर पडल्यास ह्याहूनहि अधिक दूध गुजरात पुरवूं शकेल.

**कर चुकविणारीं फिरती सिनेमागृहें**—मद्रास राज्यांतील फिरती सिनेमागृहें करमणुकीवरील कर चुकविण्यासाठी अनेक प्रकारच्या युक्त्या करतात असें आढळून आलें आहे. तिरुचिरापल्ली आणि मदुराई जिल्ह्यांत सरकारच्या तपासनिसांनीं सिनेमागृहांची अचानक तपासणी केली असतां कित्येक प्रेक्षक विना-तिकिट खेळ पहात असल्याचें उघडकीस आलें. सिनेमागृहांतून तात्पुरत्या बाहेर जाण्याच्या तिकिटांचा दुरुपयोग केलेलाहि आढळला.

**जपानी यंत्रसामुग्रीचें प्रदर्शन**—छोट्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या विविध प्रकारच्या जपानी यंत्रसामग्रीचें प्रदर्शन मुंबईमध्यें भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत निरनिराळ्या प्रकारचीं यांत्रिक हत्यारें, शेतीचीं अवजारें, शिवणाचीं यंत्रें, इत्यादि माल आहे. महाराष्ट्रांतील उद्योगधंदेवाल्यांना जपानमध्यें तयार होणाऱ्या छोट्या यंत्रसामग्रीची माहिती होण्यास प्रदर्शनाचा चांगला उपयोग होईल.

**तेल वाहून नेण्याची तयारी**—नूनमति आणि बरौनी येथील तेलशुद्धीचे सार्वजनिक मालकीचे कारखाने चालू वर्षाच्या डिसेंबरमध्यें सुरू होण्याची शक्यता आहे. तसें झाल्यास तेलाची वाहातूक मोठ्या प्रमाणावर करावी लागेल. नॉर्थ ईस्ट फ्रॉंटिअर रेल्वेनें त्या दृष्टीनें तयारी चालविली आहे. रेल्वे-स्टेशनांची सुधारणा करण्यांत येत असून रोज ५०० वॅगन्स तेल वाहून नेण्याची सोय करण्यांत येत आहे.

**भूतानच्या विकासासाठी मदत**—भूतानच्या औद्योगिक विकासाला मदत करण्याच्या दृष्टीनें नियोजन समितीनें आठ तज्ज्ञांचें एक मंडळ भूतानला पाठविलें आहे. मंडळ भूतानचा ३ आठवड्यांचा दौरा करील. भूतानमध्यें जलविद्युत् उत्पन्न करण्याची शक्यता, तेथील खनिज संपत्ति, कुशल कामगारांच्या शिक्षणाची सोय, इत्यादि बाबींविषयीं मंडळ माहिती गोळा करणार आहे.

**व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांना शिक्षण**—हिंदुस्थान स्टील लि. ह्या कंपनीमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना व्यवस्थापकीय शिक्षण देण्यासाठी रांची येथें एक केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. प्रत्येक वेळीं २० अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यांत येईल. शिक्षणक्रमांत व्याख्यानें, परिसंवाद, इत्यादींची योजना करण्यांत आली आहे. अभ्यासक्रम ६ आठवड्यांचा असेल आणि तो एका अमेरिकन तज्ज्ञाच्या देखरेखीखाली चालेल.

**सीलोन सरकारची चित्रपटांना बंदी**—भारतांत निर्माण करण्यांत आलेले सिंहली भाषेंतील चित्रपट सीलोनमध्यें दाखविण्यास बंदी करण्याचा निर्णय सीलोनच्या सरकारनें घेतला आहे. हिंदी व तामिळ भाषेंतील चित्रपटांना सिंहली संवादाची जोड दिलेली असली तरीहि हे चित्रपट सीलोनमध्यें दाखवितां येणार नाहींत. परदेशीय चलनाची बचत करणें व सिंहली चित्रपट सीलोनमध्यें निर्माण करण्यास उत्तेजन देणें हा ह्या बंदीचा उद्देश आहे.

**चळवळींमुळें आलेला खर्च**—लोकांनीं मोठ्या प्रमाणावर केलेल्या चळवळींमुळें १९५७ सालापासून पंजाब सरकारला ४२ लाख रुपये खर्च करावा लागला. नुकत्याच काढण्यांत आलेल्या अकाली शीखांच्या मोर्चामुळें ३० लाख, १९५७ सालच्या हिंदी रक्षा चळवळीमुळें १० लाख आणि १९५९ सालीं कम्युनिस्टांनीं केलेल्या करविरोधी चळवळीमुळें २ लाख रुपये, असा खर्च सरकारनें केला.


स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. इलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९६० |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०१,००० |
| ठेवी | रु. | २,२५००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,५९,००,००० |

ठेवीवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०-५० २. सेव्हिंग्ज बँक १-५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३-००

मुदत ठेवी—१ वर्ष ३-०० २ वर्षे ३-२५

३ वर्षे ३-७५ ५ वर्षे ४-००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन.

## दि मिरज स्टेट बँक, लि.

**हेड ऑफिस : मिरज**

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

**वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख**

**खेळतें भांडवल : रुपये एक कोट**

**रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर**

१ वर्ष ३¾% ३ वर्षे ४½%

२ वर्षे ४ % ४ वर्षे ५ %

५ वर्षे ५%

**हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.**

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन.

के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २ ऑगस्ट, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांच्या अंतर्गत गुप्त तरतुदी

बँकांना अंतर्गत गुप्त रिझर्व्ह राखण्याचा अधिकार चालू ठेवावा काय ? अशा गुप्त रिझर्व्हमध्यें गुप्त रीतीनें हवी तेवढी रक्कम टाकून किंवा गुप्त रिझर्व्हमधून रकमा काढून घेऊन ' निव्वळ नफा ' जाहीर करण्याचा अधिकार त्यांना असावा का ? कोणत्याहि कंपनीला, कोणत्याहि सबबीखालीं, मुद्दाम अशा गुप्त पद्धति अवलंबविण्यास परवानगी असूं नये; प्रकट चर्चा-स्वातंत्र्याच्या चालू प्रवृत्तींच्या तें विरुद्ध आहे असें म्हणण्यांत येत आहे. आपल्या शेअर्सवर पुरेसें डिव्हिडंड मिळतें किंवा नाहीं, हें भागदारांना कळायला हवें; निष्काळजीपणाला पांघरूण मिळण्याची शक्यता उरतांच कामा नये; पगारवाढीच्या वाटाघाटी करणाऱ्या नोकरवर्गाला बँकेची खरी परिस्थिति कळायला हवी; इत्यादि मुद्दे उपस्थित केले जातात. ग्रेटब्रिटनमध्यें जस्टिस जेंकिन्स ह्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटी ह्या प्रश्नाचा विचार करीत आहे. कमिटीचा अहवाल अद्याप पुरा व्हावयाचा आहे. तथापि तिला सादर करण्यांत आलेलीं निवेदनें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

क्लिअरिंग बँकांनीं पाठविलेल्या निवेदनांत बँकांची बाजू स्पष्ट करण्यांत आली आहे. बँकांची नफा लपविण्याची सवलत कायम ठेवण्यांत यावी, असें त्यांत म्हटलें असून त्याचीं कारणें खालील प्रमाणें देण्यांत आलीं आहेतः—

( १ ) बँकांच्या बाबतींत, भागदारांच्या हितसंबंधांपेक्षा ठेवीदारांच्या हितसंबंधांस प्राधान्य आहे.

( २ ) बँकिंगवर अढळ विश्वास असणें राष्ट्रीय हिताचें आहे.

( ३ ) देशांतच नव्हे, तर परदेशांतहि, आपल्या बँकांवरील विश्वास कायम टिकला पाहिजे.

( ४ ) बँकांच्या उत्पन्नांत सालोसाल मोठा फरक पडूं शकतो; त्यांच्या इन्व्हेस्टमेंटचा बाजारभाव कमी–अधिक होतो आणि लहानमोठीं बुडित कर्जें त्यांना अनुभवास येतात.

( ५ ) गुंतविलेल्या भांडवलाच्या मानानें इतर व्यवसायांत जे रिझर्व्ह मोठे समजले जातात, त्या मानानें मोठाले रिझर्व्ह बँकांना अनुकूल काळांत निर्माण करून ठेवावे लागतात; कारण, अडचणीचे वेळीं तितक्याच मोठ्या रकमा त्यांतून काढून वापरण्याची त्यांचेवर पाळी येण्याचा संभव असतो.

( ६ ) चांगल्या वेळीं मोठाल्या रकमा गुप्त रिझर्व्हमध्यें टाकण्याचें बँकांचें धोरण असलें आणि त्याचें प्रतिबिंब प्रसिद्ध होणाऱ्या हिशेबांत दिसूं लागलें, तर तें बँकांना गैरसोईचें होईल. ह्याउलट, ह्या रिझर्व्हमधून मोठाल्या रकमा काढून घेतलेलेंहि जाहीर झालें तर बँकांवरील जनतेच्या अढळ विश्वासास धक्का बसल्याविना रहाणार नाहीं. बँकिंगवरील विश्वासाचें राष्ट्रीय महत्त्व स्वयंसिद्ध आहे.

बँकांच्या हिशेबांत निष्कारण तपशीलवार माहिती देण्यानें हा विश्वास वाढण्यास मदत होईल, असें बँकांना वाटत नाहीं. बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ होत गेली आहे; त्याप्रमाणें धोकेहि कांहीं अंशीं वाढणें अपरिहार्य आहे; त्याचा अंदाज तूर्त तरी करतां येणें अशक्य आहे. एखाद्या विशिष्ट वेळीं कॉन्टिन्जन्सी फंडांत जास्त रकमा का टाकल्या, हें समजावून सांगणें बँकांना कठीण जाईल. आपल्या कर्जदारांच्या बऱ्यावाईट परिस्थितीची उघड रीतीनें चर्चा करणें बँकांना शक्य नाहीं. एखाद्या बँकेनें आपल्या कॉन्टिन्जन्सी फंडांतून जास्त रकमा काढल्या, तर त्यामुळें त्या बँकेविषयीं गैरसमज फैलावण्यास मदत होईल. चलनवाढ आणि उद्योगधंद्यांचें वाढतें आकारमान, ह्यामुळें बँकांकडे कर्जमागणीहि वाढत आहे; एकेका पार्टीला मोठालीं कर्जें देण्याची त्यामुळें आवश्यकता निर्माण होत आहे, हें विसरून चालणार नाहीं. एखाद्या बँकेनें अगदीं तात्पुरतासुद्धां ठेवीदारांचा विश्वास निष्कारण गमावणें देशहितास विघातक ठरेल. तात्कालिक कारणापुरती कांहीं रक्कम कॉन्टिन्जन्सी फंडांतून काढून वापरणें एखाद्या बँकेला आवश्यक झालें आणि त्याची वाच्यता झाली, तर त्याचा बभ्रा सर्वनाशक व्हावयाचा.

इतर कंपन्या आणि बँका ह्यांच्या परिस्थितींत फार फरक आहे. बँकांनीं आपले सर्व व्यवहार ताळेबंदांत व नफा-तोटापत्रकांत न दाखविल्यामुळें भागदारांना, ठेवीदारांना आणि सामान्य जनतेला बँकांच्या संचालकांवर पूर्ण विश्वास टाकणें अपरिहार्यच होतें. त्याखेरीज गत्यंतरच नसतें. असा विश्वास बँकांना मिळवता आला नाहीं, संचालक त्या पात्रतेचे नसतील, तर बँकिंगची पुरेशी वाढ होणारच नाहीं. सध्यांच्या गुप्त रिझर्व्हच्या पद्धतीचा फायदा बँकांप्रमाणें जनतेलाहि होत आला आहे.

---

## लिमिटेड कंपन्याकडील जनतेच्या ठेवी

जॉइंट स्टॉक कंपन्याचे ( पब्लिक आणि प्रायव्हेट, दोन्ही ) जवळ १९५८ व १९५९ मध्यें जनतेच्या किती ठेवी होत्या, १९५९ मध्यें त्यांत फरक काय पडला, हें येथें दर्शविण्यांत आलें आहे. ह्यासाठी १,००१ पब्लिक लिमिटेड कंपन्यांचे व २९३ प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांचे म्हणजे अनुक्रमें ७७% व २६% वसूल भांडवल असलेल्या कंपन्यांचे ताळेबंद तपासण्यांत आले; बँका, विमा कंपन्या व इतर आर्थिक संस्थांचे आंकडे त्यांत अर्थातच घेतलेले नाहींत. देणें बाजूंपैकीं ठेवींच्या स्वरूपाच्या रकमा मुदती ठेवी व इतर ठेवी अशा दोन शीर्षकाखालीं दाखविल्या आहेत. त्यापेक्षा जनतेच्याकडील प्रत्यक्ष ठेवी कमीच असण्याचा संभव आहे.

१,००१ पब्लिक कंपन्यांचेकडे १९५९ मध्यें २५·१ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या; १९५८ मध्यें ती रक्कम २३·८ कोटि रु. होती. कपास गिरण्या, साखर कारखाने, इंजिनिअरिंग कारखाने, केमिकल्स व वीज कंपन्या, ह्या ठेवी घेणाऱ्या कंपन्यांत प्रमुख होत्या. प्रायव्हेट कंपन्यांकडे १९५९ मध्यें २·६ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या; १९५८ मध्यें ती रक्कम २·४ कोटि रु. होती. व्यापारी, साखर आणि कपास गिरण्या, ह्या ठेवी घेणाऱ्या कंपन्यांत प्रमुख होत्या. जनतेची ठेवींच्या स्वरूपांत कंपन्यांकडे फारशी मोठी रक्कम नसते, हें ह्या आंकड्यांवरून स्पष्ट होतें.

## पूरग्रस्त सेवकांना व धंदेवाल्यांना महाराष्ट्र बँकेची मदत

पुण्यांतील महापुराला दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या डेक्कन जिमखाना कचेरीनें कसें यशस्वी रीत्या तोंड देऊन तिचा बचाव केला, ह्याची माहिती गेल्या अंकांत आम्हीं दिलीच आहे. बँकेच्या सेवकवर्गापैकी कित्येकांचें पुरामुळें नुकसान झालें आहे; त्यांस प्रत्येकी २०० रु. ते ३०० रु. देणगीच्या रूपानें देण्याचें संचालक मंडळानें तावडतोब ठरविलें. ही रक्कम रोकड न देतां शक्य तों धान्य, कपडेलत्ते, भांडीकुंडीं, वगैरे संसारोपयोगी व जीवनावश्यक वस्तूंच्या स्वरूपांत देण्यांत आली आहे; पण प्रत्यक्ष वस्तूंचें वांटप करणें अनेक कारणांस्तव योग्य न वांटल्यानें ठरलेल्या किंमतीपर्यंतच्या वस्तू बँकेनें नियुक्त केलेल्या दुकानांतून संबंधित सेवकांस विकत घेऊं देण्याचा पर्याय निश्चित करण्यांत आला आहे. कापडाकरितां चार, धान्य व किराणाकरितां तीन आणि भांड्यांसाठीं चार दुकानें नियुक्त करण्यांत आलीं.

प्रत्येक इसमास एकेक कूपन देण्यांत आलें. हें कूपन दाखविलें असतां नियुक्त दुकानांपैकी आपापल्या पसंतीच्या दुकानांतून लोकांस माल खरेदी करतां आला. हें कूपन ३१ जुलै पर्यन्त चालून मालाचीं बिलें बँक नंतर देईल. वस्तूंचे ठोकळ मानानें तीन प्रकार पाडण्यांत आले. (१) कापड, (२) भांडीं–कुंडीं, (३) धान्य व किराणा. एकाच प्रकारांत मोडणाऱ्या वस्तू एकाच दुकानांतून घ्याव्यात अशी सूचना होती. वस्तू खरेदी केल्यावर ज्या दुकानांतून त्या खरेदी केल्या असतील त्या दुकानच्या नांवापुढें खरेदी केलेल्या वस्तूंची किंमत दुकानदारांनीं लिहिली. सर्व खरेदी झाल्यावर कूपन बँकेकडे परत करण्यांत आलें. कांहीं लोकांनीं आतां जागेची सोय नसल्यामुळें वस्तूंचे ऐवजीं रोख रक्कम मिळावी असें सूचित केलें. त्यांस असें सुचविण्यांत आलें कीं, अशा तऱ्हेनें रोख रक्कम देण्यानें त्यांच्या पुढील मूळ प्रश्न सुटणार नाहीं व संचालक मंडळाचा जो हेतु आहे तोहि साध्य होणार नाहीं. तरी अशा लोकांनीं या सवलतीचा लाभ आतांच न घेतां पुढें त्यांना योग्य वाटेल तेव्हां घ्यावा. आतां न घेतल्यास पुढें त्यांना मिळणार नाहीं असें नाहीं. कांहीं लोकांनीं ह्या पूर्वीच वस्तू खरेदी केल्या असण्याची शक्यता होती. तसें असल्यास त्यांनीं त्या त्या दुकानाच्या पावत्या सादर केल्या; सदर खरेदीची रक्कम त्यांस पावत्या दाखविल्यावर रोख देण्यांत आली व सदर रक्कम मंजूर रकमेपेक्षा कमी असल्यास शिलकी रकमेच्या वस्तू विकत घेण्यासाठी कूपन देण्यांत आलें. मंजूर केलेल्या रकमेपर्यन्त कोणत्या वस्तू किती घ्यावयाच्या हें ज्यानेंत्यानें आपापल्या सोयीनें व गरजेप्रमाणें ठरवावयाचें होतें. तीनहि प्रकारच्या वस्तू प्रत्येकानें घेतल्याच पाहिजेत अशी अपेक्षा नव्हती. निर्दिष्ट दुकानांतून खरेदी केल्यामुळें त्या त्या वस्तू चालू भावापेक्षा थोड्या सवलतीच्या दरानें सेवकांना मिळल्या.

नियुक्त बँकांना जनरल मॅनेजरनीं त्याप्रमाणें पत्रें पाठवून योग्य त्या सूचना दिल्या होत्या. माल घेणाऱ्या, बँकेच्या अधिकारपत्रावर जनरल मॅनेजरची सही होती; त्या सहीचा वेगळा नमुना दुकानदारांच्या माहितीसाठी आणि दप्तरासाठी पाठविण्यांत आला. दुकानदारांनीं सवलतीच्या दरानें माल देण्याचें मान्य केलें; ही सवलत प्रत्येक खरेदीदार सेवकाला किंमत कमी आकारून द्यावयाची असून, बँकेला डिस्कौंट द्यावयाचें नाहीं, हें स्पष्ट करण्यांत आलें.

आपल्या सेवकांची अशा रीतीनें सोय पाहिल्याबरोबर बँकेनें, महापुरानें नुकसान झालेल्या धंदेवाइकांकडेहि त्वरेनें लक्ष पुरविलें. महापुरामुळें ज्यांच्या धंद्याचें नुकसान झाल्यामुळें धंदा पुनः सुरू करण्यासाठी किंवा धंदा पूर्वस्थितींत आणण्यासाठी ज्यांना कर्ज हवें आहे, अशांच्यासाठी तात्काळ अर्जाचे फॉर्म छापून घेऊन तपशील जमा करण्यांत येत आहे. शेंकडों धंदेवाल्यांनीं बँकेच्या ह्या तत्परतेचा फायदा घेण्यासाठी त्वरा केली आहे. त्यावरून, गरजेची तीव्रता आणि बँकेची समयज्ञता स्पष्ट झाली आहे. कर्ज हवें असणारांच्या परिस्थितीची छाननी करून बँक सहानुभूतीनें त्यावर सत्वर निर्णय घेईल, हें उघड आहे. ज्यांचें पूर्वी महाराष्ट्र बँकेंत खातें नव्हतें, अशा पात्र अर्जदारांचाहि बँकेकडून विचार केला जाईल.

महापुरामुळें बँकेच्या येण्यांवर कितपत परिणाम झाला असेल, ह्याविषयीं तर्कवितर्क चालू आहेत. त्याविषयीं एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें, कीं असा फारसा परिणाम होणार नाहीं; पूरग्रस्त जुन्या कर्जदारांना धंद्यांत पुनः उभें करण्यासाठी आणखी कर्ज देण्यास बँक सज्ज आहे, ही एकच गोष्ट बँकेची मजबुती स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. गेल्या वर्षी बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा झाला, त्यासाठी केवढा तरी मोठा खर्च झाला असेल; बँकेनें तो सर्वच सर्व चालू उत्पन्नांतून केला; आणि पुनः पूर्वीच्या वर्षापेक्षा जास्त नफा मिळवून जास्त डिव्हिडंड दिलें. बँक आपल्या चालू व्यवहारांतून आणि तरतुदींतून, ती महापुरानें नुकसान झालेल्यांच्या मदतीला धावून जाऊं शकत आहे; गेलीं २५ वर्षें बँकेनें अंगीकारलेलें मजबुती वाढवण्याचें 'कॉन्झर्व्हेटिव्ह' धोरण आज जनतेला प्रत्यक्षरीत्या संकटकाळीं उपयोगी पडत आहे.

---

## आर्थिक विकासाची प्रक्रिया

अमेरिकेचे भारतामधील वकील मि. जॉन गालब्रेथ ह्यांनीं मद्रास येथें बोलतांना आर्थिक विकासाच्या प्रक्रियेबद्दल कांहीं महत्त्वाचे विचार प्रकट केले आहेत. ते म्हणाले कीं, आर्थिक विकासाची प्रक्रिया ही सतत चालणारी आहे. विकासाच्या विवक्षित अवस्थेस अनुकूल अशीं धोरणें वेळोवेळीं ठेवावीं लागतात. एखाद्या विशिष्ट देशाची आर्थिक प्रगति विशिष्ट वेळीं कांहीं एका धोरणानें झाली असली तरी तेंच धोरण दुसऱ्या देशाच्या उपयोगी पडेल असें नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत भारताच्या विकासांत तांत्रिक साह्याला विशेष महत्त्व आलेलें आहे. पण लवकरच असा एक काळ येईल कीं ज्या वेळीं तांत्रिक साह्याला इतकें महत्त्व राहणार नाहीं. भारताला उत्पादनाची तंत्रविद्या तंत्रज्ञांशिवायच मिळूं लागेल. यांत्रिक कारखान्यांचा आकार वाढविण्याचा कल सध्यां दिसून येत आहे. परंतु आतां भारतांत अशी अवस्था येत चालली आहे कीं कारखान्यांचा व्याप वाढविण्यापेक्षा त्यामधील यंत्रांचा वापर अधिक कार्यक्षमतेनें करण्याकडे प्रयत्नपूर्वक लक्ष द्यावें लागेल. एखादा देश अप्रगत असेल तर त्याचा विकास घडवून आणण्यासाठी आधुनिक तंत्रविद्या, भांडवल व कुशल कामगारवर्ग ह्यांचीच काय ती गरज असते असा समज दृढमूल झालेला आहे. ह्या गोष्टींना महत्त्व नाहीं असें नाहीं. पण कांहीं देशांत कार्यक्षम सरकार, शिक्षण आणि सामाजिक न्याय ह्यांचीच वाण असते. अशा देशांना भांडवल पुरवून आणि तांत्रिक साह्य देऊन फारसा उपयोग होत नाहीं. पण वरील तिन्ही अडथळे भारतांत नाहींत. भारतांत कार्यक्षम असें सरकार आहे. साक्षरतेचें प्रमाणहि बरेंच आहे. त्याचप्रमाणें कारभारविषयक परंपरा आणि पुढाकाराची वृत्ति ह्यांचीहि वाण नाहीं. सामाजिक न्याय व प्रगति घडवून आणण्यासाठी सरकार बांधलें गेलेलें आहे. परिस्थिति एकंदरींनें अनुकूल आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## मातीचीं धरणें

पानशेतच्या धरणाच्या अपघातामुळें, मातीचीं धरणें उभारणेंच मूर्खपणाचें आहे अशी टीका केली जात आहे. मातीचीं धरणें बांधण्याच्या विद्येंत खूपच प्रगति झाली आहे; तीं धरणें काळ लोटेल त्याप्रमाणें अधिकाधिक मजबूत होत जातात; तज्ज्ञांच्या सल्ल्यानें बांधलेलीं कॉंक्रीट व दगड–चुन्याचीं धरणेंहि फुटल्याचीं ताजीं उदाहरणें आहेत. श्री. सी. बा जोशी ह्या सुप्रसिद्ध. स्थापत्य-शास्त्रज्ञांचें विवेचन येथें प्रसिद्ध करीत आहों.

"मातीच्या धरणावरील टीकेला पूर आला आहे. त्यासंबंधांत हें निदर्शनास आणलें पाहिजे, कीं फार प्राचीन काळापासून पाणी साठवण्यासाठी मातीचीं धरणें बांधण्यांत आलेलीं आहेत. जगांतील सर्व भागांत मातीचीं शेंकडों उत्कृष्ट धरणें आहेत. मातीच्या स्थापत्य शास्त्रांत गेल्या ३५ वर्षांत खूपच प्रगति झालेली आहे; डोंगर आणि पर्वत ह्या मातीच्या नैसर्गिक धरणापेक्षा मजबुतींत, अभेद्यपणांत व इतर गुणांत सरस अशीं मातीचीं धरणें बांधण्यांत मानवानें यश मिळविलें आहे. मातीचीं अत्युच्च धरणें बांधलीं जात आहेत; अमेरिकेंतील स्विफ्ट नदीवरील ट्रिनिटी धरण हें त्याचें ताजें उदाहरण आहे; त्याची तळापासूनची उंची ५३७ फूट आहे.

"मातीच्या कित्येक धरणांच्या अपयशाची छाननी केली, तर त्याच्या कारणांची कल्पना येते. बांधकाम चालू असतांनाच बहुधा अपयशाची प्रचीति येते, पण एकदा त्यांचें बांधकाम यशस्वी रीत्या पुरें झालें म्हणजे धरणाची मजबुती काळाप्रमाणें वाढतच जाते. ब्राझीलमधील ओरोस हें मातीचें धरण २६ मार्च, १९६० रोजीं फुटलें; त्याची तळापासूनची उंची १६० फूट होती. त्याचें बांधकाम चालू असतांनाच त्यावरून पाणी वाहिल्यामुळें तें फुटलें. धोक्याच्या पातळीपेक्षा धरणांत पाणी जास्त वाढलें आणि पूरामुळें खोऱ्यांत पूर पसरला.

"कॉंक्रीटच्या आणि दगड-चुन्याच्या धरणांच्या अपयशाचीं उदाहरणेंहि घडलीं आहेत. फ्रान्समधील माल्पासेट धरण फुटल्याची घटना ताजी म्हणजे १९५८–५९ मधील आहे. तें धरण कॉंक्रीटचें होतें. जगप्रसिद्ध इंजिनिअर कोएन ह्यानें त्याचे नकाशे केले होते; धरणावरील आपत्तीनंतर थोड्याच महिन्यांत तो मृत्यु पावला. त्या धरणाच्या बांधणीचें तंत्र अद्ययावत होतें; फ्रेंच सरकारनें त्या धरणाच्या अपयशाची चौकशी करण्यासाठी कमिशन नेमलें, त्याचा प्राथमिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. धरणाच्या पायांत पाणी मुरल्यामुळें तो कमकुवत झाला होता, असें त्यांत आढळलें.

"पानशेत धरणाच्या अपयशाची आमूलाग्र छाननी केली जाणें देशाच्या आणि स्थापत्यशास्त्रज्ञांच्या व्यवसायाच्या दृष्टीनें हिताचें आहे. धरण फुटूं नये म्हणून जी उपाययोजना केली, तिच्यामुळें अंतिम आपत्ति लवकर ओढविली गेली कीं काय, हेंहि तपासणें जरूर आहे. ह्या बाबतींत वस्तुस्थितीचा तपशीलवार अभ्यास पुरा झाल्याखेरीज तज्ज्ञांचें मत ( तो कितीहि उच्चपदस्थ असो ) घेण्यापासून फारसा फायदा होणार नाहीं; आपले इंजिनिअर्स असा अभ्यास हातीं घेऊं शकतील."

## रत्नजडित भूगोल

इराणमध्यें ५१,३२६ रत्नें बसवून केलेला एक भूगोल तयार केलेला असून त्याला पाहाण्यासाठी देशोदेशींचे लोक गर्दी करीत असतात. याखेरीज इराणच्या शहाजवळ कित्येक रत्नांचा संग्रह असून त्या सर्वांची किंमत साडे दहा कोटि डॉलर्स एवढी आहे.

## परदेशीय मदतीच्या जरूरीचा अंदाज

भारताचा औद्योगिक विकास साधण्यासाठी जेथून मदत मिळेल तेथून ती स्वीकारण्याचें सरकारचें धोरण आहे. देशाच्या औद्योगिक विकासासाठी किती परदेशीय मदत लागेल ह्याचा एक अंदाज प्राध्यापक महालनवीस ह्यांनीं केला आहे. प्राध्यापक महालनवीस ह्यांनीं अर्थशास्त्रज्ञ आणि आंकडेशास्त्रज्ञ म्हणून कीर्ति मिळविलेली आहे. ते म्हणतात कीं, चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमापर्यंत प्रगतीची वाटचाल चालू ठेवण्यासाठी भारताला २,००० कोटी डॉलर्सच्या परदेशीय मदतीची आवश्यकता आहे. चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमापर्यंतच्या कालांत खुद्द भारताकडून जितकी भांडवल–गुंतवणूक करण्यांत येईल त्याच्या सुमारें एकषष्ठांश इतकी ही रकम आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार करतां हिंदमधील प्रत्येक माणसामागें १० पौंड इतकें हें प्रमाण पडतें. इतकी परदेशीय मदत फार आहे असें मानण्याचें कारण नाहीं. दुसरें असें कीं, चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमानंतर भारताला परदेशीय मदतीची जरूरच भासणार नाहीं. म्हणजे भारताची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गाला लागेल. आज जगांतील जे देश अप्रगत आहेत त्यांचा विकास घडवून आणणें हें चिरस्थायी शांतता राहण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. अप्रगत देशांची आर्थिक उन्नति करण्याचें कार्य हें सर्वच देशांच्या हिताचें आहे. ह्या कार्यामुळें कोणत्याहि देशांवर विपरित परिणाम होणार नाहीं. अप्रगत देशांना मदत करण्याच्या कामीं प्रगत देशांत थोडीबहुत स्पर्धा असणें ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं. अशी स्पर्धा असेल तर अविकसित देशांना अधिक मदत मिळणें शक्य होईल. शिवाय, परदेशीय मदतीची आवश्यकता एकदां निश्चित झाल्यावर प्रगत देशांना शक्य तितकी मदत देण्याचें टाळतां तरी कसें येणार?

## माध्यमिक शाळांसाठी मोकळी जागा मिळविणार

मुंबई सारख्या मोठ्या शहरांतून अलीकडे माध्यमिक शाळांची संख्या अपुरी पडू लागली आहे. मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशननें शहरांतील मोकळ्या जागांपैकीं कांहीं जागा राखून ठेवण्याची तयारी दाखविली आहे. ह्या मोकळ्या जागा कॉर्पोरेशनकडून घेऊन बिनसरकारी शाळांच्या चालकांना देण्याचा विचार महाराष्ट्र सरकार करीत आहे. शाळाचालकांनीं ह्या जागांवर इमारती बांधून नव्या माध्यमिक शाळा काढाव्या, अशी सरकारची अपेक्षा आहे. इमारतीसाठी लागणारा पैसा माध्यमिक शिक्षकांच्या प्रॉव्हिडंट फंडामधून कर्जाऊ द्यावा किंवा काय, ह्याचाहि विचार सरकार करीत आहे.

## निरनिराळ्या राज्यांतील पुरांबाबत अहवाल

भारत सरकारच्या गृहखात्यानें निरनिराळ्या राज्यांत पुरानें झालेल्या नुकसानीचे अहवाल मागितले आहेत. ओरिसा, महाराष्ट्र व मद्रास राज्यांत आलेल्या पुरांची पाहाणी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें आपले इंजिनिअर्स पाठविले होते. त्यांनीं आपले अहवाल सरकारकडे पाठविले आहेत. आतां अहवालांचा अभ्यास करण्यांत येत आहे. दरम्यान, पुण्याजवळील पानशेतच्या धरणाबद्दल दिल्ली येथील सरकारी गोटांत चौकशी करण्यांत आली होती. पानशेतच्या धरणांत घाईघाईनें पाणी सांठविण्यांत आल्यामुळें तो फुटला अशी जी टीका करण्यांत येत आहे तींत अर्थ नाहीं, असें सरकारी गोटाचें म्हणणें आहे. मातीच्या धरणाच्या आधुनिक तंत्राप्रमाणें धरण पक्कें होण्यास विशेष थांबावें लागत नाहीं, असें तज्ज्ञांचें मत असल्याचें सांगण्यांत येत आहे.

## कमाल जमीन धारणा कायदा व जमिनीचे व्यवहार

कमाल जमीन धारणा कायदा अंमलांत येणार म्हणून कांहीं मोठे जमीनदार कायद्यामध्यें दिलेल्या कमाल जमिनीपेक्षा जास्त असलेली जमीन विकत आहेत. कमाल मर्यादेपेक्षा जास्त जमीन असणाऱ्यांनीं जमिनीबाबतचे व्यवहार करून कायद्याचा मूळ हेतूच नष्ट करूं नये म्हणून कायद्याच्या कलम १० मध्यें मुद्दाम तरतूद करण्यांत आलेली आहे. त्यान्वयें ४ ऑगस्ट, १९५९ नंतर व कायदा अंमलांत येण्याचा दिवसापर्यंतचा प्रत्येक जमिनीबाबतचा व्यवहार हा कायद्याच्या मूळ उद्देशाविरुद्धच केलेला आहे असें मानण्यांत येईल व स्वतःच्या अशा जमिनीबाबत जो व्यवहार करील त्याचा व्यवहार त्याच्याकडे कमाल जमीन किती राहावी हें ठरवितांना लक्षांत घेतला जाणार नाहीं. त्यानंतर जादा म्हणून ठरविण्यांत आलेली जमीन प्रत्यक्ष कबजेदाराकडून घेण्यांत येईल व अशी ताब्यांत घेण्यांत आलेली जमीन पुरेशी न पडल्यास ज्या जमिनीबाबत व्यवहार करण्यांत आला आहे ती जमीन ताब्यांत घेण्यांत येईल. ज्याचे नांवानें हा व्यवहार करण्यांत आला आहे हा कमाल मर्यादेपेक्षा कमी जमीन करीत असला तरीहि अशी जमीन ताब्यांत घेण्यांत येईल. त्यामुळें ४ ऑगस्ट, १९५९ नंतर व कायदा अंमलांत येण्यापूर्वी ज्यानें कमाल मर्यादेपेक्षा जास्त जमीन असणाऱ्याकडून जमीन खरेदी केली असेल त्याचें नुकसान होईल. ही गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे. विशेषतः खरेदी घेणार हा लहान शेतकरी असल्यास त्यांस कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळणार असली तरीहि त्यांस हें नुकसान जास्तच जाणवेल व म्हणून जनतेनें कमाल जमीन धारणा कायद्याच्या १० व्या कलमानुसार दि. ४ ऑगस्ट, १९५९ ते कायदा अंमलांत येण्याच्या तारखेपर्यंतच्या जमिनीबाबतच्या व्यवहारावर काय परिणाम होतो यांनीं माहिती करून घेणें आवश्यक आहे.

---

## खडकवासला धरणाच्या धोक्यांचा इतिहास

खडकवासला धरण ८९ वर्षांपूर्वी कर्नल फाईफ ( रॉयल मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिस ) ह्यानें बांधलें. पहिल्याच वर्षी धरणांत पाणी सांठवलें, तेव्हां भोंक पडलेल्या भांड्यांतून पाणी गळावें, तसें धरणाच्या भिंतींतून पाणी गळूं लागलें. बाहेरच्या बाजूनें, तळाशीं १२५ फूट आणि वरती २० फूट रुंद अशा भिंती बांधून कर्नल फाइफनें त्याला मजबुती आणली. चालू शतकाच्या प्रारंभीं धरणाच्या सुरक्षितपणाविषयीं पुनः शंका निर्माण झाली; धरणाच्या बांधकामावरील दाब कमी करण्यासाठी त्यावेळीं मुंबई सरकारच्या नोकरींत असलेले डॉ. विश्वेश्वरअय्या ह्यांनीं पीकॉक बे टेकडीच्या बाजूकडील भागांत ऑटोमॅटिक फ्लड गेट्स बसविली. १९२९ सालींहि पुनः पावसाच्या अतिरेकामुळें धरणाबद्दल चिंता निर्माण झाली होती. प्रत्यक्ष अपघात जुलै, १९६१ मध्यें होऊन पुणें शहरावर अनर्थ ओढवला.

## शेंकडा ५ अर्भकें अनौरस

अमेरिकेंत १९५९ मध्यें जन्मलेल्या अर्भकांपैकी २,२१,००० अनौरस होती. म्हणजे त्यांचें एकूण जननाशीं प्रमाण ५% पडलें.

## साखरेच्या निर्यातीच्या मार्गांतील अडचणी

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत हिंदमधील साखरेचें उत्पादन देशांतील गरजेपेक्षा अधिक होऊं लागल्यानें शिल्लकी साखरेला परदेशीय बाजारपेठा शोधण्याचे प्रयत्न भारत सरकार करीत आहे. परंतु ह्या बाबतींत अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. साखर निर्माण करणाऱ्या व निर्यात करणाऱ्या देशांची कौन्सिल ऑफ शुगर अग्रीमेंट ह्या नांवाची जागतिक संघटना आहे. ह्या संघटनेचा भारत नुकताच सभासद झालेला आहे. संघटनेचा सभासद झाल्यामुळें भारताची साखर अमेरिकेला निर्यात करण्यांतील अडचण निवारली गेली आणि अमेरिकेनें भारताकडून चालू वर्षी २·२५ लाख टन साखर घ्यावयाचें कबूल केलें. ह्यापेक्षाहि अधिक साखर अमेरिकेनें घ्यावी म्हणून खटपट चालू आहे. दरम्यान क्यूबामधील साखर पश्चिम आशिआमधील बाजारपेठेंत पडलेल्या भावानें विकण्यांत येत आहे. कारण, क्यूबाची साखर कम्युनिस्ट राष्ट्रगटामार्फत पश्चिम आशिआच्या बाजारपेठेंत उतरविण्यांत येत आहे. कम्युनिस्ट गटांतील देश क्यूबाची अशुद्ध साखर विकत घेतात, ती चांगली शुद्ध करतात व साखरेच्या जागतिक बाजारभावापेक्षा कमी भावांत विकतात. ह्या परिस्थितीमुळें भारताच्या साखरेला पश्चिम आशिआंत बाजारपेठ मिळणें अवघड झालें आहे. पाकिस्ताननें भारताकडून २५,००० टन साखर विकत घ्यावयाचें ठरविलें होतें. पण क्यूबाची साखर स्वस्त मिळत असल्यानें पाकिस्ताननें भारताबरोबर केलेला करार रद्द केला आहे. इराणला ५०,००० टन साखर निर्यात करण्यासंबंधींहि बोलणीं चालू होतीं. परंतु इराणनें दर टनामागें सुचविलेली किंमत जागतिक बाजारांतील किंमतीपेक्षा इतकी कमी आहे कीं वाटाघाटी पुढें चालविणें अशक्य झालेलें आहे. आतां फक्त मलाया आणि अफगाणिस्थान ह्या देशांना साखर निर्यात करण्याची शक्यता आहे.

---

## ऑक्सफर्ड येथील अभ्यास-वर्गांत बँक ऑफ महाराष्ट्राचे श्री. पटवर्धन

ऑक्सफर्ड येथें ब्रिटिश इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स या संस्थेच्या वतीनें एक अभ्यासवर्ग आयोजित करण्यांत आला होता. ता. १७ ते २८ जुलैपर्यंत चाललेल्या या अभ्यासवर्गास ५१ देशांतील २१० बँक-तज्ज्ञ उपस्थित असून भारतांतून बँक ऑफ महाराष्ट्राचे श्री. व्ही. पटवर्धन आणि सेंट्रल बँकेचे श्री. नौशीर एस. मिस्त्री हे गेलेले होते. अभ्यास-वर्गांतील चर्चेचें उद्घाटन "डेली मेल" चे अर्थ-संपादक श्री. पॉल बॅरो यांनीं केलें. त्यानंतर कांहीं प्रबंधहि वाचण्यांत आले.

## प्लॅस्टिकचीं नाणीं

ब्रिटिश सरकार प्लॅस्टिकचीं नाणीं सुरू करण्याचा विचार करीत आहे. दशमानपद्धति सुरू करायची किंवा नाहीं, हें ठरल्यावर प्लॅस्टिकच्या नाण्यांसंबंधीं निर्णय घेण्यांत येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## पुरुषोत्तमदासांचा उद्योगपतींना आदर्श

"वास्तविक गैरसमजाला कारण नसतांहि गैरसमज निर्माण केला जात आहे अशा परिस्थितींत, राजकीय सत्तेसाठी स्पर्धा चालू असतांना, व्यापार आणि उद्योगक्षेत्रांतील नेत्यांवर एक मोठी जबाबदारी येऊन पडते. व्यापारी व कारखानदार ह्यांना आपलें वर्तन व धोरण हिंदी जनतेच्या हितास धरून आहे असें पटवून देतां येईल, इतकेंच नव्हे तर भारताच्या आर्थिक अभ्युदयाच्या दिशेस योग्य वळण लावतां येईल, अशा रीतीनें त्यांनीं चोख वागायला हवें." कै. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं १९५५ सालीं आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून केलेल्या भाषणांतील हा उतारा आहे.

सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या निधनानें, व्यापारी-वर्गांतील ज्याच्याकडे आदरानें बोट दाखवितां येईल. अशी एक थोर व्यक्ति नाहींशी झाली आहे. त्यांचा अभ्यास दांडगा होता; १६ विरुद्ध १८ पेन्सांच्या हुंडणावळीच्या लढ्यांत त्यांनीं भारताची बाजू हिरिरीनें मांडली होती. व्यापार, शेती, कारखानदारी, वाहतूक, विमा, बँकिंग, इत्यादि क्षेत्रांतील त्यांची कामगिरी फार मोलाची झाली. ते जितक्या कंपन्यांचे डायरेक्टर होते, तितक्या कंपन्यांचे दुसरे डायरेक्टर आढळणें कठीण आहे; ह्या प्रत्येक कंपनींत ते शोभेचे डायरेक्टर नसून ते मार्गदर्शक होते; कित्येकांचे ते चेअरमन होते. त्यांचें लिखाण आणि भाषण नेहमीं अचुक माहितीवर आधारलेलें असायचें. इंडियन मर्चंटस चेंबर, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन, सिडेनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, इत्यादींच्या स्थापनेंत त्यांचें महत्त्वाचें अंग होतें. त्यांनीं मोठाल्या देणग्या दिल्या, पण त्या विवेकानें; मुख्यत: तांत्रिक शिक्षणसंस्था, इस्पितळें व शिक्षणसंस्था, ह्यांना. ग्रामीण भागांतील संस्थांकडे त्यांचें विशेष लक्ष असे. सुरतमधील शिक्षणाच्या सर्व उपलब्ध सोयींच्या मागें सर पुरुषोत्तमदास ह्यांचें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दातृत्व आहे, असें म्हटलें जातें. ते स्वत: सुशिक्षित होते; त्यांना वाचनाची अतिशय आवड होती. त्यांच्या-सारखे व्यापारी आणि उद्योगपती असतील, तर 'प्रायव्हेट सेक्टर' विरुद्ध प्रचाराला धारच राहाणार नाहीं, असें एका लेखकानें म्हटलें आहे.

### किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लि.

वरील कंपनीला ३१ मार्च, १९६१ अखेर संपलेल्या वर्षी ८.८८ लक्ष रु. घसारा, ६.८७ लक्ष मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना आणि ८.४७ लक्ष रु. कामगारांना बोनस, अशा तरतुदी करून ७१.२६ लक्ष रु. निव्वळ नफा झाला. गेल्या वर्षी तो १०.८४ लक्ष रु. होता. करासाठी ३२ लक्ष रु. लागतील. २५.८५ लक्ष रु. जनरल रिझर्व्हमध्यें घातले जातील. डिव्हिडंडची रक्कम ६ लक्ष रु. होईल.

### नवी इंग्रजी वर्णमाला

अवघ्या दोन आठवड्यांत सहज लहान मुलांना वाचतां येईल, अशी नवी इंग्रजी वर्णमाला लंडन शहरांतील सर जोम्स पिओतान यांनीं केली आहे. या नव्या वर्णमालेचीं अक्षरें ४३ आहेत. तींमध्यें 'P' आणि 'X' हीं दोन अक्षरें वगळण्यांत आलीं आहेत; पण त्याचबरोबर १९ नवीन अक्षरेंहि अधिक घालण्यांत आलीं असल्याचें म्हटलें आहे. चोवीस ब्रिटिश शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांस या नव्या वर्णमालेचें शिक्षण देण्यांत येणार आहे.

### निर्यात व्यापारांत घट होण्याची शक्यता

ब्रिटन हा देश संकल्पित युरोपिअन कॉमन मार्केटच्या योजनेंत सामील होण्याच्या वाटाघाटी चालू आहेत. ह्या योजनेंत सामील होण्याचा निर्णय ब्रिटननें घेतला तर त्याचा परिणाम भारतावर काय होईल, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न झाला आहे. भारत सरकारचें व्यापार व उद्योग खातें ह्यासंबंधी विचार करीत आहे. कॉमनवेल्थ राष्ट्रगटांत असलेल्या देशांच्या निर्यात व्यापाराला धोका पोंचूं नये म्हणून युरोपियन कॉमन मार्केटच्या योजनेंत कांहीं सवलती असाव्या असे प्रयत्न चालू आहेत. ते कितपत फलद्रूप होतील तें इतक्यांत सांगतां येणार नाहीं. कांहींच सवलती न मिळाल्या तर भारताला ब्रिटनशीं होणाऱ्या आपल्या व्यापारा-पैकीं एकपंचमांश निर्यात व्यापार गमवावा लागेल असा अंदाज खात्यानें केला आहे. चालू सालीं भारत ब्रिटनला २०० कोटी रुपयांचा माल निर्यात करील असा अंदाज करण्यांत आलेला आहे. पण सवलती न मिळाल्यास निर्यात व्यापार ४० कोटी रुपयांनीं घटेल. चहा आणि ताग ह्यांच्या निर्यातींत म्हणण्या-सारखी घट होणार नाहीं. परंतु कापडाच्या निर्यातींत मात्र ५० टक्के घट होईल. सध्यां भारताला कापडाच्या निर्यातीमुळें १९ कोटी रुपयांची प्राप्ति होते. ही प्राप्ति १० कोटी रुपयांपर्यंत खालीं येण्याची शक्यता आहे. ह्या परिस्थितीचा विचार करून भारत सरकारनें सवलतींची त्रिविध योजना ब्रिटनला सुचविली आहे असें समजतें. भारताच्या निर्यात व्यापाराला सध्यां अनन्य-साधारण महत्त्व प्राप्त झालेलें आहे. कारण, देशाची अर्थ-व्यवस्था स्वयंचलित करण्यासाठी जो पायाभूत औद्योगिक विकास करावा लागतो तो अद्याप व्हावयाचा आहे. हा विकास घडवून आणण्यासाठी परदेशीय चलनाची अतिशय आवश्यकता आहे आणि हें चलन निर्यात व्यापाराच्या मार्गानें जितकें मिळेल तितकें कमीच आहे.

### राजस्थानांतील टोळधाडी

राजस्थानच्या पश्चिमेकडून टोळांचे १०-१२ थवे राज्यांत घुसले असून ते पिकांवर धाड घालीत आहेत. त्यांपैकीं कांहीं थवे १६ चौरस मैल पसरलेले आहेत. जेसलमीर भागांत टोळांनीं अंडीं घालण्यासहि प्रारंभ केल्याची वार्ता आहे. टोळांचे आणखीहि थवे येण्याची शक्यता असल्यानें मध्यवर्ती सरकारच्या टोळ-प्रतिबंधक संघटनेनें कीटकनाशक औषधाचे फवारे मारण्यासाठी विमानें पाठविलीं आहेत.

### म्हैसूर राज्यांतील पुराचा प्रताप

म्हैसूर राज्यांत नुकत्याच झालेल्या पुरामुळें रस्त्यांची व त्या-वरील पुलांची बरीच हानि झाली आहे. रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती करण्यासाठी ५० लाख रुपये लागतील असा अंदाज आहे. कृष्णराजसागर तलावांत येणाऱ्या पाण्याचें प्रमाण आतां बरेंच उतरलें आहे.

### १६८ व्या वर्षी निधन

पाकिस्तानमधील अत्यंत वयोवृद्ध मनुष्य मीर नवाझ अली हा नुकताच निधन पावला. मृत्यूसमयीं तो १६८ वर्षांचा होता. या मीर नवाझ अलीनें स्वत:चें आरोग्य शेवटपर्यंत ठणठणीत ठेवलें होतें. मोगलराज्य, ब्रिटिश राज्य व आतांची पाकिस्तानी राजवटहि त्यानें आयुष्यांत पाहून घेतली होती. हा अति वयोवृद्ध मुस्लिम हृदयक्रिया बंद पडून मरण पावला.

## उद्योगधंदे वाढविण्यासाठी कॉर्पोरेशनची स्थापना

महाराष्ट्र राज्यांतील उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठी एक कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा विचार राज्य सरकार करीत आह. उद्योगधंद्यांना लागणारी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी कांहीं विशेष अधिकार कायदा करून स्वत:कडे घेण्याचें सरकारनें ठरविले आहे. गेल्या कांहीं वर्षांत मोठ्या शहरांतील औद्योगिक विभागांतील जमिनींच्या किंमती भरमसाठ वाढल्यानें सरकारला ही उपाययोजना करावी लागत आहे. कॉर्पोरेशनची स्थापना करणारें बिल लवकरच राज्यसरकारच्या कायदेमंडळांत मांडण्यांत येईल. बिलाला महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट बिल असें संबोधण्यांत आलें असून त्यात एकूण ६९ कलमे आहेत. कॉर्पोरेशनचें नांव महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलमेंट कॉर्पोरेशन असें आहे. राज्य सरकारनें ह्यापूर्वी बोर्ड ऑफ इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटची स्थापना केली होती. ह्या संघटनेची देण्याघेण्याची सर्व जबाबदारी संकलित कॉर्पोरेशन आपणाकडे घेईल. कॉर्पोरेशनमध्यें सरकारी व बिनसरकारी मिळून सात सभासद असतील. स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड आणि हौसिंग बोर्ड ह्यांच्या प्रतिनिधींचाहि ह्यांत समावेश आहे. औद्योगिक विकासासाठी लागणारा सर्व पैसा सरकार पुरवू शकणार नाहीं. सरकारकडून मिळणाऱ्या द्रव्यसाहाय्याला जोड देण्यासाठी कॉर्पोरेशनला नाणेबाजारांत कर्ज उभरण्याचे आधिकार देण्यांत येतील. औद्योगिक विकासाच्या योजना कार्यक्षम रीतीनें व जलद् अंमलांत आणण्यासाठी स्वतंत्रपणें निर्णय घेण्याचे अधिकार कॉर्पोरेशनला असतील. जरूर पडल्यास शहरी वस्तीचें नियोजन करण्याचें आणि विवक्षित भूभाग उद्योगधंद्यांना उपयोगी पडण्यासारख्या योजना कॉर्पोरेशनला हातीं घेतां येतील आणि त्यासाठी स्थानिक स्वरूपाचे करहि बसविता येतील.

औद्योगिक विकासासाठी लागणाऱ्या जमिनींच्या किमती भडकू नयेत आणि जमिनींच्या खरेदीविक्रींत सट्टेबाजी होऊं नये म्हणून अशा जमिनी जरूर पडल्यास सक्तीनें आपल्या ताब्यांत घेण्याचे अधिकार बिलान्वयें सरकार आपल्याकडे घेणार आहे. अशा रीतीनें घेतलेली जमीन सरकार कॉर्पोरेशनला अगर दुसऱ्या एखाद्या उद्योगधंद्याला देईल. तथापि, विकासक्षम अर्थव्यवस्थेत जमिनीची किंमत कांहीं प्रमाणांत वाढणें अपरिहार्य असल्यानें जमिनीच्या मालकांना त्यांच्या जमिनीच्या किंमतीत झालेली वाजवी वाढ देण्याच्या कामीं आक्षेप घेण्यांत येणार नाहीं. एखाद्या औद्योगिक विभागांत रस्ते, इमारती, सांडपाणी, इत्यादींची व्यवस्था करण्यासाठी कॉर्पोरेशन जी आणखी सोय करून देईल, तिच्या बाहेर कोणालाहि जातां येणार नाहीं. उद्योगधंदे काढावयाचें म्हटलें म्हणजे नाना प्रकारचे परवाने सरकारी अधिकाऱ्यांकडून मिळवावे लागतात. पुष्कळदां असे परवाने देण्याच्या बाबतींत एकापेक्षा अधिक अधिकाऱ्यांचा अगर खात्यांचा संबंध असतो. अशा परिस्थितींत उद्योगधंदे काढणाऱ्यांची पंचाईत होते आणि कामाचा खोळंबा होतो. म्हणून कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनाच जरूर ते परवाने देण्याचे अधिकार देण्यांत येणार आहेत. एखाद्या उद्योगधंद्याला लागणाऱ्या जरुरीच्या सोयी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मिळविण्यासाठी ह्या संस्थांना योग्य त्या सूचना देण्याचे खास अधिकार सरकारनें आपणाकडे घेतलेले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरविता येत नाहीं अशा प्रकारची एखादी सोय एखाद्या उद्योगधंद्याला लागत असेल तर ती पुरविण्यासाठी सरकारला सूचना देता यावी, म्हणून हे खास अधिकार घेण्यांत आलेले आहेत.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर.

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | ... | रु. ३६,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १८ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ७७ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

— १९ जून, १९६१ पासून सुरू झालेल्या ५ नव्या शाखा —

सावंतवाडी, मालवण, कुडाळ, बांदा व फोंडा

—१ जुलै, १९६१ पासून सुरू झालेल्या ७ नव्या शाखा—

लक्ष्मीरोड, पुणें २, कँप, पुणें १, लोणावळा, खोपोली, बारामती, श्रीरामपूर, ओझर (ताम्बट)

जनरल मॅनेजर

### हलक्या लाकडाचा उपयोग

ठाणें जिल्ह्यांतील व विदर्भाच्या कांहीं भागांतील हलक्या जातीच्या मिळणाऱ्या लाकडाचा उपयोग करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. यासाठीं ५४ लक्ष रुपये खर्च करून तीन केंद्रेंहि स्थापन करण्यांत येतील. प्रस्तुत योजनेमुळें हलक्या प्रतीच्या लाकडांचा योग्य उपयोग करतां येईल व इमारतींच्या लाकडालाहि थोडी मदत होईल असें वाटतें. त्यामुळें आदिवासी जनतेला रोजगाराची सोयहि होऊं शकणार आहे.

---

### एक उपयुक्त पुस्तिका

एक पुस्तिका भारत सरकारनें प्रसिद्ध केली आहे. "फॅसिलिटीज् फॉर टेक्निकल एज्युकेशन इन् इंडिया" हें या पुस्तिकेचें नांव आहे. अद्यावत् माहितीपूर्ण अशा या पुस्तिकेंत विविध शिक्षण-संस्था, त्यांचे अभ्यासक्रम, शैक्षणिक वर्ष, प्रवेशाच्या अटी, राखीव जागा, फी, शिष्यवृत्त्या, इत्यादि भरपूर उपयुक्त माहिती देण्यांत आली आहे. स्वातंत्र्योत्तर तांत्रिक शिक्षणाची प्रगति भारतामध्यें झपाट्यानें होत आहे. १९४७ मध्यें पदवी व प्रमाणपत्र परीक्षांचा अभ्यासक्रम असलेल्या अनुक्रमें ३८ व ५३ संस्था होत्या; त्यांत अनुक्रमें २,९४० व ३,६७० विद्यार्थ्यांची सोय होत होती. १९५९-१९६० मध्यें पदवी व प्रमाणपत्र परीक्षेस बसणारांची व्यवस्था अनुक्रमें ८७ व १६६ शिक्षणसंस्थांतून होत होती. त्यांतून सुमारें ११,२७० व २०,६६० एवढे विद्यार्थी शिक्षण घेत होते.

---

### भाषांतर करणारें यंत्र

भाषांतर करण्याच्या कामांत नवा विक्रम करणारें एक यंत्र नुकतेंच प्रात्यक्षिक स्वरूपांत पुढें आलें आहे. या यंत्राची शक्ति एका तासांत साठ हजार शब्दांचें भाषांतर करण्याची आहे. या यंत्राचें प्रात्यक्षिक म्हणून 'प्रवदा' या प्रमुख रशियन नियतकालिकाचा एक लेख पंचकार्ड व मॅग्नेटिक टेपच्यामार्गे त्या यंत्रांत टाकण्यांत आला व लागलेंच त्या लेखाचें इंग्रजी भाषांतर वेगानें बाहेर पडूं लागलें. याच गतीनें एखाद्या सबंध कादंबरीचें भाषांतर अवघ्या तीन तासांत होऊं शकतें. हें यंत्र एका रशियन महिलेनें तयार केलें आहे. आज या महिलेचें वय ४० वर्षांचें आहे. तिचे यजमान जर्मन असून ते अर्थशास्त्रज्ञ आहेत. दोघांनीं मिळून या यंत्रावर सहा वर्षें संशोधनकार्य केलें आहे. अशा तऱ्हेचीं यंत्रें तयार करण्यासाठी फेडरल सरकार पुढें आलें असून पहिलें यंत्र लवकरच तयार होईल. हें यंत्र एका तासामध्यें एक लक्ष, पन्नास हजार शब्द भाषांतरित करून दाखवील.

---

### अधिक नवीन धान्यकोठारें बांधणार

भारतांत सुमारें पंधरा कोटी डॉलर्स खर्च करून धान्य ठेवण्यासाठी कोठारें बांधण्यांत यावयाचीं आहेत. या कोठारांच्या बांधणीसाठी भारतीय व अमेरिकेमधील खाजगी कंपन्या साहाय्य देणार आहेत. भारतांत सात प्रमुख ठिकाणीं हीं धान्यकोठारें उभारलीं जातील व त्यांत ३० लक्ष मेट्रिक टन अन्नधान्य सांठवितां येईल. तीन अमेरिकन कंपन्या धान्यकोठारें बांधण्याचें आवश्यक त्या साधनसामग्रीचा पुरवठा करण्याचा पत्कर घेणार आहे. त्यासाठी भारतीय कंपनी (दिल्लीतील) कारभाराची जबाबदारी स्वतःकडे घेईल. या योजनेवर गेलीं दोन वर्षें विचार झालेला असून त्याकरितां दोन इंजिनियर्सच्या पथकांनीं जागांची पाहाणी करण्याकरितां भारतास भेट दिली होती.

---


## भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरीत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज-वसुली, पेन्शन, कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे — अध्यक्ष
न. भू. ना. पां. थोपटे — उपाध्यक्ष
श्री. गो. बा. देवी
श्री. बा. ग. धंदुके


---


गेलीं सतत तीस वर्षें लोकसेवेच्या आघाडीवर
ठेवीदारांचे विश्वासास पूर्णपणें पात्र झालेली व शेअर-होल्डर्सना योग्य मोबदला देणारी

## दि बेळगांव बँक लिमिटेड

हेड ऑफिस—बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० वर |

बँक कॉल डिपॉझिट व अल्प मुदतीच्या ठेवी, आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.

समक्ष चौकशी करा.

होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर द. द. ३ टक्के व्याज.
एक ते पांच वर्षें मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर द. द. ३½ ते ४½

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दि बेळगांव बँक लिमिटेड करितां

ए. आर. नाईक,
बी. ए., बी. एमसी., एलएल्. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर

## गुजरातमधील तेलशुद्धीचा कारखाना

भारताच्या तेल आणि नैसर्गिक वायुमंडळाची बैठक दोन दिवस भरली होती. गुजरातमध्यें स्थापन करण्यांत यावयाचा तेलशुद्धीचा कारखाना बडोद्यापासून ८ मैलांवरील एका गांवीं स्थापन करण्याचें बैठकींत ठरविण्यांत आले. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत देशांतील खनिज तेलाच्या उत्पादनाचें लक्ष्य दरसाल ३० लाख टनांऐवजीं ५० लाख टन असावें असाहि निर्णय घेण्यांत आला. तेलाच्या शोधासाठी लागणारा पैसा अधिक प्रमाणांत उपलब्ध झाला पाहिजे असें मत बैठकींत व्यक्त करण्यांत आलें. ह्या बैठकीला रशिअन तज्ज्ञ हजर होते.

## इंदूर शहरासाठी सहकारी पद्धतीनें दूधपुरवठा

इंदूर व त्याच्या आसपासच्या २० मैलांच्या परिसरांत दूध व दुधाचे पदार्थ ह्यांचा पुरवठा करण्यासाठी माळवा सहकारी दूधपुरवठा संघ ह्या नांवाची संस्था नोंदण्यांत आली आहे. दूधपुरवठा करण्यासाठी माळव्यांत स्थापन करण्यांत आलेली ही पहिलीच सहकारी संस्था आहे. तिचें भांडवल २५ लाख रुपये आहे. संस्थेतर्फे सुरुवातीला दररोज १०० मण दूध पुरविण्यांत येणार आहे. त्याशिवाय लोणी, तूप, इत्यादि पदार्थहि संस्थेतर्फे करण्यांत येणार आहेत. इंदूर शहरांतील व आसपासच्या खेड्यांतील २५ सहकारी संस्थांनीं मध्यवर्ती संस्थेच्या भांडवलापैकी १॥ लाख रुपये भांडवल जमविलें आहे.

## औद्योगिक शक्ति विपुल होण्याची शक्यता

हैड्रोजन बाँबची संहारक शक्ति जगाच्या परिचयाची झाली आहे. ह्या बाँबच्या स्फोटामुळें उत्पन्न होणारी शक्ति नियंत्रित करून तीपासून औद्योगिक शक्ति मिळविण्यासाठी पुढारलेल्या देशांतील शास्त्रज्ञ प्रयत्न करीत आहेत. रशिआंतील शास्त्रज्ञांची एक बैठक ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी वॉर्सा शहरांत भरली होती. बैठकीचे अध्यक्ष प्राध्यापक एमेल्यानोव्ह ह्या विषयासंबंधीं बोलतांना म्हणाले, कीं हैड्रोजन बाँबच्या स्फोटाचा उपयोग करून वीज निर्माण करतां येणें शक्य आहे. सध्यांच्या पिढीलाहि हा चमत्कार पाहतां येणें संभवनीय आहे. ही शक्यता प्रत्यक्षांत उतरल्यावर विजेची शक्ति हवेइतकी विपुल व स्वस्त होईल, असें मानण्यास जागा आहे.

## घरबांधणीवर होणारा खर्च

मध्यवर्ती सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतर्फे घरबांधणीवर ४० कोटी रुपयांची रक्कम तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खर्च करण्यांत येणार आहे. ह्या रकमेपैकी ३ कोटी रुपये रक्कम ग्रामीण घरबांधणीवर खर्च होणार आहे. त्याशिवाय निरनिराळीं राज्य सरकारें घरबांधणीवर १५ कोटी रुपये खर्च करणार आहेत. ज्या ठिकाणीं समाजविकास योजना चालू आहेत त्या ठिकाणींहि घरबांधणीचा कार्यक्रम जलद पार पाडण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

## तार देण्याच्या अधिकाराची व्याप्ति

इंडिअन टेलिग्राफ रूल्समध्यें दुरुस्ती करण्यांत आली आहे. आतांपर्यंत तार ज्याच्या नांवाची असेल त्यालाच ती देतां येत असे. पण दुरुस्त नियमाप्रमाणें देशांतर्गत कोठलीहि तार, ज्याच्या नांवाची ती असेल त्याला, अगर त्याच्या कुटुंबांतील वयांत आलेल्या माणसाला, अगर त्याच्या नोकराला, अगर त्याच्याकडे असणाऱ्या पाहुण्याला, देतां येईल.

## अवकाशांतील फिरती वेधशाळा

अंतरिक्ष प्रवासाबाबत रशिआ आणखी एक पाऊल पुढें टाकण्याच्या प्रयत्नांत आहे. पृथ्वीच्या वातावरणापासून अलिप्त असलेला एक उपग्रह चंद्राच्या परिसरांत सोडावयाचा व त्यांतून खगोलशास्त्रविषयक निरीक्षण करण्याची सोय करावयाची, असा हा प्रयत्न आहे. उपग्रहांत असणाऱ्या माणसाला, पृथ्वीवर असतांना जें निरीक्षण करतां येईल त्यापेक्षा अधिक चांगलें निरीक्षण करतां येईल असता अंदाज आहे.

## भिलईच्या परिसरांतील उद्योगधंदे

भिलई येथील पोलादाच्या कारखान्याच्या परिसरांत छोटेमोठे उद्योगधंदे काढण्यांत येत आहेत. ह्या उद्योगधंद्यांना पाण्याचा पुरवठा करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें एक योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेसाठी ३२·२५ लाख रुपये खर्च येणार आहे. भिलईच्या आसपास सिमेंटचा कारखाना, खताचा कारखाना व इतर कांहीं कारखाने उभारण्याचें काम चालू आहे. कारखान्यांची स्थापना पद्धतशीर रीतीनें व्हावी म्हणून मध्यप्रदेश सरकारनें एक स्वतंत्र बोर्डच निर्माण केलें आहे. नवीन कारखाने काढण्यासाठी उद्योगपतींना आवाहनहि करण्यांत आलें आहे.

## राजस्थानमधील कालव्यासाठी कर्ज

राजस्थान-कालवा योजनेवर १९६१–६२ सालांत खर्च करण्यासाठी म्हणून भारत-सरकारनें राजस्थान सरकारला १·७५ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. १९५७–५८ सालापासून आतापर्यंत ह्या योजनेसाठी भारत सरकारनें १४·७० कोटी रुपये कर्ज म्हणून मंजूर केलेले आहेत.

## शिरगणतींत काम केलेल्यांचा सन्मान

शिरगणतीच्या कामांत उत्कृष्ट काम केलेल्या १६,००० मोजणीदारांना येत्या १५ ऑगस्टला चांगल्या कामाबद्दल पदकें देण्यांत येणार आहेत. १९६१ च्या शिरगणतीच्या कामांत निरनिराळ्या श्रेणींचे १ लाख गणक काम करीत होते. त्यांतून वरील मोजणीदारांची निवड करण्यांत आली आहे. पदकाबरोबर ह्या गणकांना राष्ट्राध्यक्षांच्या सहीचें एक प्रशस्तिपत्रहि देण्यांत येणार आहे.

## ब्रिटनमध्यें जाणारे हिंदी नागरिक

चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतामधून ब्रिटनला जाणाऱ्या हिंदी नागरिकांची संख्या ८,८५० होती. गेल्या वर्षी ह्याच कालांत २,४०० हिंदी नागरिक ब्रिटनला गेले होते. पाकिस्तानमधून ब्रिटनला गेलेल्या नागरिकांची संख्या अनुक्रमें ७,८५० व १०० अशी आहे. हे नागरिक देशांतर करून ब्रिटनमध्ये स्थाईक होण्यासाठी गेलेले असतात.

## प्रिन्स फिलिप्सला अपघात

पोलो खेळाच्या सामन्यांत प्रिन्स फिलिप्सच्या डाव्या घोट्याची बरीच नादुरुस्ती झाली. अर्जेंटिनांच्या खेळाडूबरोबर तो खेळत असतांना घोड्याशीं टक्कर होऊन त्याचें हाड मोडलें आहे, असें बकिंगहॅम पॅलेसमधून जाहीर करण्यांत आलें आहे. खेळ संपेपर्यंत प्रिन्स फिलिप्स खेळ खेळतच होता. फक्त जखम होताच थोडा वेळ तो थांबला होता.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.